**प्रेसनोट दिनांक २६/०७/२०१९**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**
**विमानतळ पोलीसांनी हत्यार जवळ बाळगुन फिरत असलेल्या इसमास जेरबंद करुन उत्कृष्ठ कामगिरी केले बाबत....**

दिनांक २२/०७/२०१९ रोजी पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे, पो ना. २५७६ विश्वनाथ गोणे, पो हवा. अजय खराडे, पो.ना. ६७०४ राहुल मोरे, पो.ना. २२६९ संजय आढारी, पो.ना. १७६२ विशाल गाडे असे विमानतळ पोलीस स्टेशनचे हददीमध्ये गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करीत असताना १९/१५ वाजता त्यांना त्यांचे बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, पंचशिल चौकासमोर मोकळे मैदानात शकील नावाचा मुलगा हा त्याचे पाठीमागे कमरेमध्ये कोयत्या सारखे हत्यार खोचुन फिरत आहे त्याचा अंगात लाल रंगाचा फुल बाहयांचा शर्ट व काळे रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे. वगैरे मजकुराची बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी जावुन पाहणी करीत असताना तो पोलीसांना पाहुन मोकळे मैदानात जोरात पळु लागल्याने पोलीसांनी त्याचा पाठलाग करुन त्याला थोडयाच अंतरावर १९/२५ वाजता ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नांव शकील शब्बीर शेख वय १९ वर्षे रा. गल्ली नंबर ५, मज्जीद गल्ली कलवडवस्ती लोहगांव पुणे असल्याचे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेला मागील बाजुस एक लोखंडी कोयता लावलेचा मिळुन आल्याने तो पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे यांनी ताब्यात घेतला.

सदरचे आरोपीस विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे आणुन त्याने मा. पोलीस सह आयुक्त सो कायदा व सुव्यवस्था पुणे शहर यांचे कार्यालयीन जा क्रं .६०११/२०१९ दिनांक १०/०६/२०१९ अन्वये दिनांक १३/०७/२०१९ रात्रौ ००/०१ पासुन ते दिनांक २३/०७/२०१९ रोजी रात्रौ २४/०० वा पर्यत आपले कब्जात शस्त्रे सोटे, तलवार, भाले बंदुका जेणे करुन शरीरास इजा करण्यासाठी वापरात येईल असे घातक हत्यार जवळ बाळगणेस बंदी असताना त्या आदेशाचा भंग केलेला असल्याने पो ना विश्वनाथ गोणे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी त्याचे विरुध्द सरकारचे वतीने महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७ (१)(३) सह १३५ व भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) प्रमाणे फिर्याद दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि नंबर २८५/२०१९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन त्याचेजवळील किं.रुपये १००/- लोखंडी कोयता पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे यांनी गुन्हयाचे पुराव्याकामी पंचनाम्याने जप्त केलेला आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे करीत आहेत.

**(राजेंद्र पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे.**